अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि.२५ जानेवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १२० वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## माढा नगरपंचायतीचे करनिर्धारण अधिकारी अखेर निलंबित....

माढा : माढा नगरपंचायतीमधील करनिर्धारण अधिकारी सुभाष जाधव यांना अखेर डॉ.किरण कुलकर्णी संचालक तथा आयुक्त नगरपरिषद संचालनालय मुंबई यांनी आज दिनांक २४ जानेवारी पासून निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत.

याबाबतची अधिक माहिती अशी माढा नगरपंचायतीच्या करवसुलीमध्ये अपहार झाल्याची शंका आल्याने मुख्याधिकारी यांच्या आदेशान्वये सर्व सभापती आणि नगरपंचायत अधिकारी यांची संयुक्त समिती स्थापन करून तपासणी केली होती. यावेळी मोठा अपहार झाल्याचे निदर्शनास आले होते. यानंतर या सर्व बाबीसह विनापरवाना गैरहजर राहणे, कामात हलगर्जीपणा, कामास टाळाटाळ करणे, नगरपंचायतीच्या सभांना अनुपस्थित राहणे, लेखापरीक्षण अभिलेख उपलब्ध करून न देणे, दैनंदिन कराचा भरणा न करणे, अनेक कागदपत्रावरती मुख्याधिकारी करिता म्हणून स्वाक्षरी करून ना हरकत दाखला देणे आदी अनेक कारणांसाठी सुभाष जाधव यांना निलंबित करण्यात येत असल्याचा आदेश नगरविकास संचालनालय मुंबई यांच्याकडून मंगळवारी प्राप्त झाला आहे. दरम्यान, या कालावधीत सुभाष जाधव यांनी सोलापूर येथील नगरविकास मुख्यालय शाखा सोलापूर येथे उपस्थित राहणे बंधनकारक असून त्यांचा निर्वाह भत्ता हा माढा नगरपंचायतीकडून सोलापूर कार्यालयाचे उपस्थिती रेकॉर्ड मागवून काढणे बंधनकारक आहे.

दरम्यान करवसुलीशी निगडित माढा नगरपंचायतीचे कर्मचारी दत्ता कुर्डे यांनाही मुख्याधिकारी चरण कोल्हे यांनी वेळेवर करपुस्तक जमा न करणे आणि नगरपंचायतीच्या न.प.फंडात रक्कम जमा न करणे या कारणास्तव निलंबित करण्यात आले आहे.

# मुलाने विवाहितेला पळवलं, संपूर्ण कुटुंबानं आयुष्यच संपवलं

सुराज्य/दौंड

**ते पोटचं लेकरू. त्या लेकरानं पळवून आणलं दुसऱ्यांचं लेकरू. तेही विवाहित. बाप गबरू होता. पण तो अब्रूला घाबरला. लेकराला समजावून सांगितलं. पण ऐकणाऱ्यापैकी ते लेकरू नव्हतंच. त्यानं बापाला साफ धुडकावलं. तेव्हा बापानं सहकुटुंब विष पिऊन मरणार असल्याचं धमकावलं. तरीही पोरगं मागं नाही हटलं. मग काय? बापानं आईला सोबत घेतलं. संगतीला मुलगी आणि जावईबापूसुध्दा होतेच. शिवाय मुलीची तीन छोटी-छोटी लेकरं. सगळी घरातून अचानक गायब झाली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी भीमेच्या पात्रात एक मृतदेह सापडला. चौथ्या दिवशी दुसरा; पाचव्या आणि सहाव्या दिवशी एक-एक; त्यानंतर सातव्या दिवशी एकदम तीन मृतदेह सापडले. या प्रकारामुळं अख्खा भीमाकाठ हादरला असून ही हत्या की आत्महत्या? असा प्रश्न प्रत्येकाच्या तोंडून ऐकायला मिळत आहे.**



**फोनमुळे ओळख पटली :** पारगाव येथील भीमा नदी पात्रात एक एक करून सात दिवसात सात मृतदेह आढळले. त्यातीलच एका महिलेच्या मृतदेहावरील कपड्यांमध्ये एक मोबाईल सापडला. त्या मोबाईलवरून पोलिसांना मृतदेहांची ओळख पटवण्यात यश आले.

**घातपाताचा संशय :** घडलेली ही घटना आत्महत्या नसून यामध्ये घातपाताची शक्यता अधिक आहे. त्यामुळे पोलिसांनी या घटनेचा सखोल तपास करावा. जोपर्यंत तपास होत नाही; तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही.

**- दीपक शिंदे (मृत श्यामराव फुलवरे यांचे मेहुणे)**



राणी व शामराव फुलवरे



संगीता व मोहन पवार



कृष्णा फुलवरे

**असं आक्रीत काय घडलं? :** मृत मोहन पवार यांना दोन मुलं. त्यापैकी अमोल हा त्यांच्याजवळ राहतो, तर राहुल हा पुण्यात. अमोलनं दोनच दिवसांपूर्वी त्यांच्या नात्यातीलच एक विवाहित मुलगी पळवून आणली. हे त्याचे वडील मोहन पवार यांना पटलं नाही. त्यांनी त्या मुलीला तिच्या घरी सोडण्यास अमोलला बजावलं. पण त्यानं नाही ऐकलं. म्हणून वडिलांनी सहकुटुंब आत्महत्या करण्याची धमकी अमोलला दिली. तरीही अमोल हटला नाही. त्यानंतर वडिलांनी त्यांचा दुसरा मुलगा राहुलला फोन करून सहकुटुंब आत्महत्या करणार असल्याचं सांगितलं आणि फोन बंद करून ठेवला. पुढं काय झालं कुणालाच कळलं नाही. जेव्हा एक एक करत पारगाव इथं भीमा नदीच्या पात्रात सातही मृतदेह सापडले; तेव्हाच हा प्रकार उघडकीस आला आणि संपूर्ण भीमाकाठ हादरला.

**असं कसं घडलं? :** पवार पती-पत्नी हे बीड जिल्ह्याच्या गेवराई तालुक्यातील खामगाव येथील मूळचे रहिवाशी. त्यांचे जावई श्याम फुलवरे व त्यांचे कुटुंबीय हे उस्मानाबाद जिल्ह्यातील. ते मजुरीसाठी निघोज येथे आले होते. त्या ठिकाणी एका वर्षापासून ते मोलमजुरीचे काम करत होते. या ठिकाणापासून नगर जिल्ह्याची हद्द जवळ आहे. हे सर्वजण निघोजमध्ये राहत होते. अमोलने मुलगी पळवून आणल्यानंतर दि. १७ जानेवारी रोजी रात्री हे कुटुंब निघोजमधून अचानक गायब झाले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे १८ जानेवारीला एका महिलेचा मृतदेह आढळला. त्यानंतर २० जानेवारी रोजी एका पुरुषाचा, २१ जानेवारी रोजी पुन्हा एका महिलेचा, २२ जानेवारी पुन्हा एका पुरुषाचा आणि त्यानंतर २४ जानेवारी रोजी तीन लहान मुलांचे मृतदेह आढळून आले.

ही घटना मंगळवारी उघडकीस आली असून दौंड(जि. पुणे) तालुक्यातील पारगाव येथील भीमा नदीच्या पात्रात हा प्रकार घडला आहे. मोहन उत्तम पवार (वय ४५), त्यांची पत्नी संगिता ऊर्फ शहाबाई मोहन पवार (वय ४०, दोघेही रा. खामगाव, ता. गेवराई, जि. बीड), श्याम पंडित फुलवरे (वय २८ जावई), राणी श्याम फुलवरे (वय २४ मुलगी), रितेश ऊर्फ भैया श्याम फुलवरे (वय ०७), छोटू श्याम फुलवरे (वय ०५), कृष्णा श्याम फुलवरे (वय ०३, सर्व रा. हातोला, ता. वाशी, जि. उस्मानाबाद) अशी मृतदेह सापडलेल्या व्यक्तींची नावे आहेत.

## महापालिकेचे यंदाचे अंदाजपत्रक वास्तववादी राहणार : आयुक्त

### थकीत कर वसुलीला प्राधान्य देण्यावर प्रशासनाचा भर

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिकेच्या अंदाजपत्रकासाठी तयारी सुरू आहे. याबाबत बैठकही पार पडली आहे. यंदाचे अंदाजपत्रक हे वास्तववादी राहील. वाढीपेक्षाही थकित कर वसुलीला प्राधान्य देणार असल्याचे महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी स्पष्ट केले.

महापालिका प्रशासनाकडून यंदाच्या अंदाजपत्रक तयारीसाठी लगबग सुरू आहे. यासाठी नुकतीच एक बैठकही घेण्यात आली आहे. थकीत वसुली करण्यात येत असताना खर्च मात्र जैसे ते आहे. गेल्या अनेक वर्षापासूनची थकबाकी त्याचबरोबर चालू कर असे दोन्ही मिळून ३० टक्के वसुलीचे प्रमाण आहे. तर चालू कर वसुलीमध्ये ८८ टक्के वसुली करण्यात यश आले आहे. महापालिका प्रशासनाकडून या थकबाकी वसुलीकडे प्राधान्याने लक्ष देण्यात येत आहे.



**रेडीरेकनर संदर्भात शासन आदेशामुळे वसुलीला ब्रेक**

रेडीरेकनर दरासंदर्भात गाळे भाडे वसुलीला शासनाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना स्थगितीचे आदेश दिले आहेत. यामुळे सोलापूर महापालिकेच्या गाळे भाडे वसुलीला ब्रेक लागला आहे. यामुळेही उत्पन्नावर परिणाम झाला असल्याचे आयुक्त शितल तेली - उगले यांनी सांगितले.

**कनिष्ठ अभियंत्यांच्या बदल्या**

महापालिकेतील कनिष्ठ अभियंत्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. कामाच्या सोयीसाठी या बदल्या करण्यात आल्याचे महापालिका आयुक्त तेली-उगले यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, यंदाचा महापालिकेचे अंदाजपत्रक हे वास्तववादी राहील. यंदाचा अंदाजपत्रके वास्तववादी करण्याचा प्रयत्न राहील. कोणत्याही वाढीपेक्षा थकबाकी वसुलीला प्रशासन प्राधान्य देणार आहे. दरम्यान, उत्पन्न वाढीसाठी नवे स्त्रोत्र काही निर्माण करता येतील का? याचाही विचार करण्यात येत असल्याचेही आयुक्त उगले यांनी यावेळी सांगितले.

## शहर परिसरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी दोन तरुणांचे आढळले मृतदेह

सुराज्य/सोलापूर

शहर व परिसरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी पाण्यामध्ये दोघा तरुणांचे मृतदेह तरंगताना आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. त्यातील एकाची ओळख पटली असून दुसऱ्याची अद्याप पटलेली नाही.

पहिल्या घटनेत मंगळवारी सकाळी अकराच्या सुमारास पुणे नाका ते हैद्राबाद रस्ता बाह्यवळण रस्त्यावर शेतकी फार्मच्या विहिरीत गोविंद देविदास कौटल्य (वय ५५, रा. महर्षी गौतमनगर सोसायटी, शेळगी) यांचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला. ही बाब उघडकिस आल्यानंतर जोडभावी पेठ पोलीस ठाण्यातील पोलीस नाईक एन. ए. पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह पाण्यातून बाहेर काढून शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविला. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे. दुसऱ्या घटनेत रेल्वे लाइन्स भागातील महापौर भागातील वैशाली वाईन शॉपच्या मागे इमारतीच्या बांधकामासाठी खोदलेल्या खड्ड्यामध्ये साचलेल्या पाण्यात एका अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळला. त्या तरुणाची





अद्याप ओळख पटलेली नाही. त्या तरुणाचे वय ३० ते ३५ दरम्यान आहे. मंगळवारी बाराच्या सुमारास या भागातील नागरिकांना पाण्यात तरुणाचा मृतदेह नजरेस पडला. त्यानंतर सदर बझार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन लोकांच्या मदतीने पाण्यातून मृतदेह बाहेर काढला. घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शासकीय रुग्णालयात पाठविला. या घटनेची प्राथमिक नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

## धर्मपुरीत कॅनॉलमध्ये सोलापुरातील इसमाचा खून

सुराज्य/सोलापूर

धर्मपुरी (ता.माळशिरस) येथील निरा कॅनॉलमध्ये सोलापुरातील एका ३८ वर्षीय विवाहित इसमाचा मृतदेह खून केलेल्या अवस्थेत आढळून आला. ही घटना रविवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली. संतोष सोमा घोडके (वय ३८ रा. डोणगाव रोड, सलगरवस्ती, सोलापूर) असे खून झालेल्या इसमाचे नाव आहे.


त्यांचा मृतदेह रविवारी दुपारी एकच्या सुमारास धर्मपुरी येथील निरा-उजवा कॅनॉलच्या पाण्यात तरंगताना आढळून आला. त्यांचा अनोळखी इसमाने तीक्ष्ण शस्त्राने गळा कापून पुरावा नष्ट करण्यासाठी कॅनॉलच्या पाण्यात टाकून दिल्याचे निष्पन्न झाले. यासंदर्भात त्यांची पत्नी मीनाक्षी संतोष घोडके (वय ३२ रा. लक्ष्मीनगर, हत्तुर) यांनी नातेपुते पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी इसमाविरुद्ध खून करून पुरावा नष्ट केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी रविवारी दुपारी एकच्या सुमारास धर्मपुरी येथील कृष्णा मोरे यांच्या





घरापाठीमागील निरा(उजवा) कॅनॉलच्या पाण्यात एका अनोळखी इसमाचा मृतदेह तरंगताना आढळून आला.

नातेपुतेच्या पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. तेव्हा मयताचा गळा तीक्ष्ण शस्त्राने कापल्याले दिसून आले. मयताच्या खिशात सापडलेली चिठ्ठी आणि रेल्वेच्या तिकिटावरून मयताचीच ओळख पटली. तेव्हा त्याचे नाव संतोष घोडके असे असून तो सोलापुरात राहणार असल्याचे समजले. ते राजुरी (ता.पुरंदरवाडी जि.पुणे) येथील एका पोल्ट्री फार्म मध्ये सुपरवायझर म्हणून काम करीत होते.गेल्या काही वर्षापासून ते पत्नीपासून विभक्त राहत होते. त्यांची पत्नी मुलांसह हत्तुर येथे राहण्यास आहे. १३ जानेवारी रोजी संतोष हे सोलापुरात आले होते.त्यांच्या खिशात १७ जानेवारी रोजी रेल्वेने प्रवास केल्याचे तिकिट आढळले. दरम्यान मयत संतोष यांच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीवरून नातेपुतेच्या पोलिसांनी अनोळखी इसमाविरुद्ध खून करून पुरावा नष्ट केल्याचा गुन्हा दाखल केला. खून कोणी केला आणि यामागचे कारण काय? हे अद्याप समजले नाही. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक संपांगे करीत आहेत.



॥ ॐ गं गणपतये नमः ॥ श्री गायत्रीदेवी प्रसन्न ॥

॥ श्री गणेश जयंती ॥

सालाबादप्रमाणे बुधवार दि. २५/०१/२०२३ रोजी
श्री गणेश जयंती निमित्त दुपारी १२ वाजता

॥ गुलालाचा कार्यक्रम ॥

आयोजित करण्यात आला आहे. तरी यानिमित्त
दु. १२.३० ते ३.३० महाप्रसादाचा लाभ घ्यावा.

• विनित •
कोठे परिवार

• स्थळ •
सिध्दी विनायक गायत्री मंदिर
सुशील रसिक सभागृह प्रांगण, मुरारजी पेठ, सोलापूर.

**तिसरा डोळा**

– प्रकाश पोरे



गळती थांबली पाहिजे !!!

| कल्याण |
| --- |
| 177-56-123 |

| मेन बाजार |
| --- |
| 150-64-680 |

## कॅन्सरमुळे जवळची माणसं गमावलेल्या शास्त्रज्ञाने शोधलं सेंद्रीय खत

### माळशिरस तालुक्यातील दसूरच्या शेतकऱ्याकडे गव्हावर प्रयोग



सुराज्य/माळशिरस

सोलापुरी चादरी आणि कडक भाकरीसाठी राज्यात प्रसिद्ध असणाऱ्या जिल्ह्यात ज्वारीचं उत्पादनही मोठ्या प्रमाणात होते. पण, सोलापूर जिल्ह्यातले शेतकरी भविष्यात गव्हाची निर्यात मोठया प्रमाणावर करतील, असं तुम्हाला सांगितलं तर... तुमचा कदाचित विश्वास बसणार नाही. पण, हे शक्य आहे.

सोलापूर जिल्ह्यातल्या माळशिरस तालुक्यातील दसूर येथील शेतकरी सुभाष कागदे यांच्या शेतात याबाबतचा प्रयोग देखील सुरू आहे. गुजरातमधल्या सुरतचे डॉ. सलीम चेन्नीवाला यांनी त्यांच्या प्रदीर्घ संशोधनातून 'जैनम चरखा' आणि 'क्रांती' या सेंद्रीय खताची निर्मिती केली आहे.सेंद्रीय शेतीचा पर्याय अवलंबला तर येत्या काळात सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी देखील आपल्या गव्हाची निर्यात देशभर करू शकतात. गव्हाच्या निर्यातीमध्ये उत्तर भारतामधील राज्यांची मक्तेदारी आहे. बाहेरच्या देशामध्येही याला मोठी मागणी आहे. उत्पादन वाढीच्या शर्यतीमध्ये हे शेतकरी रासायनिक खतांचा वापर करून जमिनीचा कस आणि आरोग्यास धोका निर्माण झाले आहेत.

कर्करोग मुक्त भारत करणे हा मुलभूत संकल्प करून डॉ. ए.एस चन्नीवाला यांनी अनेक वर्षाच्या अथक संशोधनातून सेंद्रिय खताची निर्मिती केली आहे.शेतकऱ्यांनी रसायन मुक्त शेतीचे महत्त्व पटवून देण्यासाठी ते कार्यशाळेच्या माध्यमातून मार्गदर्शन करत आहेत. हे खत पिकास वापरल्या नंतर शेतकऱ्यांना युरिया, डि ए.पी, पाण्यात विरघळणारे एन पी के, सुक्ष्म अन्नद्रव्ये, सल्फेट खते किंवा कोणतेही रासायनिक खत वापरण्याची गरज पडत नाही. आपले पिक चांगल्या किमतीत विकायचे असेल किंवा रोगमुक्त राहायचे असेल तर हे खत योग्य आहे. चार एकर मध्ये हे खत वापरले आहे. फरक दिसून आला आहे. लवकरच गहू तयार होवून खाण्यासाठी वापर करणार आहे.

**- सुभाष कागदे. शेतकरी, दसूर (ता. माळशिरस)**